# Government Polytechnic, Aurangabad.

(An Autonomous Institute of Govt. of Maharashtra)
Osmanpura, Aurangabad - 431005
Phone: (Office) (0240) 2334724, (P) 2353644
website: www.gpabad.ac.in
E-mail: : principal.gpaurangabad@dtemaharashtra.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र./शातंनिऔ/EC/2022/ 308 दिनांक — 12/09/2022

**महत्वाचे परिपत्रक :**

**विषय : उन्हाळी परीक्षा 2022 (212) मध्ये अंतिम सत्र / वर्षातील अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या अनुत्तीर्ण विषयांच्या फेरपरीक्षेबाबत.**

संदर्भ : 1) मा. मंत्री महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी विधिमंडळ अधिवेशानत दिनांक 24/08/2022 रोजी केलेले निवेदन.

2) जा.क्र. मरातंशिमंडळ/का-40/वि.स./उ.प्.22/2022/178 दिनांक 25/08/2022.

वरील विषयाच्या अनुषंगाने उन्हाळी परीक्षा 2022 (212) मध्ये अंतिम सत्र / वर्षातील अनुत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांच्या अनुत्तीर्ण विषयांच्या तसेच त्यांच्या असलेल्या उन्हाळी परीक्षा 2022 (212) मधील अनुतिर्ण बॅकलॉग विषयांची फेरपरीक्षा अपवादात्मक परिस्थितीत विशेष बाब म्हणून आयोजित करण्यात येत आहेत.

त्याबाबत सर्व संबंधितांना खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

1) **फेरपरीक्षाबाबतचे संक्षिप्त वेळापत्रक**

| **अ.क्र.** | **फेर-परीक्षेचा तपशील** | **कालावधी** |
|---|---|---|
| 01 | विद्यार्थ्यांनी स्वत:च्या लॉगीनमधून परीक्षा अर्ज आवश्यक ते शुल्क भरून निश्चित करणे. **(Rs. 600/-)** | 14 ते 16 सप्टेंबर 2022 (03 दिवस) |
| 02 | प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षा (Practical / Oral Exam) | 19 ते 21 सप्टेंबर 2022 (03 दिवस) |
| 03 | लेखी परीक्षा | 22 सप्टेंबर 2020 ते 03 ऑक्टोबर 2022. |

2) **फेरपरीक्षेबाबत महत्वाच्या सूचना :**

1. ज्या विद्यार्थ्यांनी उन्हाळी परीक्षा 2022 करीता अंतिम सत्र / वर्षातील तसेच त्यांचे असलेले बॅकलॉग विषयांचा परीक्षा अर्ज निश्चित केला होता, तसेच उन्हाळी परीक्षा 2022 चा निकाल **Fail/ATKT** असा असेल, अशाच विद्यार्थ्यांना त्यांच्या अनुत्तीर्ण विषयांकरीताच फेरपरीक्षेची संधी देण्यात येणार आहे.
2. फेरपरीक्षेच्या संधीचा लाभ घेण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी वरील मुद्दा क्र. 1 मध्ये नमुद परीक्षा अर्ज वेळापत्रकानुसार व आवश्यक परीक्षा शुल्कासह स्वत:च्या **(Login)** लॉगीनमधून **www.gpabad.org.in** या संकेत स्थळावरून भरणे आवश्यक आहे.
3. फेरपरीक्षेचा निकाल लवकर जाहीर करणे आवश्यक असल्याने फेरपरीक्षेचा अर्ज भरण्याकरीता मुदतवाढ देता येणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.
4. दिव्यांग विद्यार्थ्यांकरीता संस्थेच्या परीक्षाविषयक नियम **ER-7 (H)** नुसार सोयीसुविधा देण्यात येईल.
5. उन्हाळी परीक्षा 2022 (212) दरम्यान गैरप्रकार प्रकरणी शिक्षा झालेल्या अंतिम सत्र/वर्षातील विद्यार्थी सदर फेरपरीक्षेकरीता पात्र असणार नाहीत.
6. सदर फेरपरीक्षेच्या निकालानंतर गुणपडताळणी फोटोकॉपी व पुनरर्गुणमूल्यांकन सुविधा देण्यात येणार नाही.
7. **ज्या विद्यार्थ्यांना फेरपरीक्षेचा** Online Form **भरताना अडचण येतील यांनी 14/09/2022 ते 16/09/2022 या कालावधीतच परीक्षा विभागाशी संपर्क विभाग साधावा. 16/09/2022 नंतर फेरपरीक्षेचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत, याची सर्वांनी नोंद घ्यावी.**

**प्र. प्राचार्या,**
शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद.

प्रत : 1) सर्व विभागप्रमुख 2) विद्यार्थी नोटीस बोर्ड 3) विद्यार्थी विभाग.
4) प्रा. जे.पी. जोशी यांना संस्थेच्या वेबपोर्टलवर प्रसिध्दीसाठी.